लवाद.दर.क्रं.१४६३/२०२२

श्रीराम फाय.वि.दिलीप उगीले

**<u>नि.क्रं. ३८ खाली आदेश</u>**

सदर अर्ज दि.प्र.संहीता१९०८ क्रम २१ नियम ६६ दरखास्तदारने दिला असून जाबदाराच्या विरुध्द दि.प्र.संहीता १९०८ क्रम २१ नियम ५४ अन्वये दिलेल्या अर्जानुसार मौ.उगीलेवाडी येथील गट क्रं. ४४ जी दरखास्तदारकडे गहाण आहे. तिचा लिलाव होऊन मिळावा म्हणून अर्ज केला आहे. सोबत शपथपत्र नि.क्रं.३९ सादर केले आहे.

प्रस्तुत जाबदार हा याकामी नोटीस नि.क्रं.५ व ६ हा बजावणी होऊन सुध्दा हजर राहिला नसल्याने दरखास्त त्याच्याविरुध्द एकतर्फा चालविण्यात आली. सदर जाबदार दिलीप बाबुराव उगीले याच्या जमीनीवर इतर अधिकारात बँक ऑफ महाराष्ट्र शाखा काजळ हिप्परगा आणि लातूर जिल्हा मध्यवर्ती सह.बँक यांचा बोजा असल्याचे दिसते. सबब, सदर दोन्ही बँकाना नोटीस काढून सदर मिळकत जप्त करण्यापूर्वी त्यांचे काही म्हणणे आहे काय हे ऐकणे आवश्यक आहे. तसेच जाबदार क्रं. १ यालाही शेवटची संधी म्हणून सदर लिलावापूर्वी नोटीस काढून त्याचे काही म्हणणे आहे काय हे विचारणे आवश्यक आहे. सबब, पुढील कोणतेही कार्यवाही होण्यापूर्वी वर नमूद व्यक्तींना वर नमूद कारणांसाठी नोटीसा काढाव्यात.

स्वाक्षरीत/-

**[एस.एन.सरडे]**

**दिनांक: १४/११/२०२५.**

दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
अहमदपूर.